# स्थलांतर आणि ग्रामीण युवा पिढी

**प्रा. दिनेश ज्ञानेश्वरराव पेटकर**
**(समाजशास्त्र विभाग)**
**मो. नं : ९०४९६७२८८१**
**EMAIL ID – dpetkar22@gmail.com**

## सारांश–

भारतीय समाज व्यवस्थेचा मुख्य कणा हा ग्रामीण समुदाय आहे. आज २१ व्या शतकात आणि विज्ञान युगातही ग्रामीण व्यवस्थेत अनेक आव्हानात्मक बदल हे निश्चितच तरुण पिढीला स्थलांतर प्रक्रियेकडे एक मूलभूत आणि ग्रामीण समाज व्यवस्थेचा एक अंगीभुत घटक म्हणून स्वीकारायला भाग पाडत आहे. अर्थातच यातून ग्रामीण व्यवस्थेमध्ये अनेक बदलात्मक स्थित्यंतरे घडून यायला देखील ग्रामीण व्यवस्था जणू तरुण पिढीला स्थलांतरणाची व्यवस्था स्वीकारण्यास आकर्षित करू पाहत आहे. २०२४–२५ च्या लोकसंख्या अहवालानुसार २६८ मिलियन लोकसंख्या ही (१५–२९वर्ष वयोगट)ही आजही ग्रामीण भारतात वास्तव्यास आहे, त्यातील १०.७%युवा ग्रामीण लोकसंख्या ही बेरोजगार आहे, आणि बाकी तरुण पिढी ही आजही इतर व्यवसाय तसेच पारंपारिक व्यवसायाकडे वळल्याचे दिसते. यातून भारतीय ग्रामीण समुदायांमध्ये अनेक सामाजिक, कौटुंबिक, शैक्षणिक, आर्थिक स्वरूपाचे आव्हानात्मक बदल आज या नव्या आधुनिक व्यवस्थेच्या निमित्ताने स्थलांतरण प्रक्रिया एक आव्हान ठरू पाहत आहे, आणि त्यातून दुसरीकडे वाढते शहरीकरण, जागतिकीकरण, आधुनिकीकरण, सांस्कृतिकीकरण, पाश्चिमात्यिकरण यासारख्या अनेक समस्यांचा सामना देखील आज या स्थलांतरण प्रक्रियेच्या निमित्ताने भारतीय ग्रामीण समाज व युवा वर्गापुढे फार मोठी गंभीर समस्या बनल्याचे दिसून येते.

## मुख्य शब्द (शोध लेखातील)

आधुनिकीकरण, स्थलांतरण, पाश्चिमात्यिकरण, सांस्कृतिकीकरण, जागतिकीकरण, शहरीकरण, कौटुंबिक व्यवस्था

## प्रास्ताविक

आज भारतीय समाज व्यवस्थेचा मुख्य कणा म्हणून ओळखला जाणारा समुदाय ग्रामीण समुदाय व त्यातील विशेषत: युवा वर्ग आज स्थलांतरणाच्या समस्येने ग्रासलेला दिसतो आहे. आणि या स्थलांतरण प्रक्रियेच्या अनुषंगाने ग्रामीण समाज व्यवस्थेच्या विविध संबंधीत घटकांवर दूरगामी विपरीत परिणाम निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. स्थलांतर प्रक्रियेमध्ये मुख्य लक्षणीय बाब म्हणजे एक प्रवाही स्थलांतर आहे. हे जास्त प्रमाणात ग्रामीण भागात तसेच ज्या ठिकाणी स्थलांतरित समूह वर्ग होतो तिथे देखील या स्थलांतर प्रक्रियेचा विपरीत परिणाम दिसून येतो. स्थलांतर प्रक्रिया ही आज आधुनिक व्यवस्थेच्या विविध घटकांचा परिपाक असलेली प्रक्रिया दिसून येते.

ग्रामीण रोजगाराची स्थिती२०२४–२०२५च्या सांख्यिकीय माहितीनुसार ग्रामीण बेरोजगारी दर~2-4%

श्रमशक्ती सहभाग (ग्रामीण) ६१.२%, ग्रामीण कामगार लोकसंख्या दर ५९.७ % (Source: Periodic Labour Force Survey - PLFS) २०२५ च्या नुकत्याच अहवालावर आधारित आहे.

वरील आकडेवारी पाहता ग्रामीण युवा स्थलांतर प्रक्रिया ही झपाट्याने होत असलेली एक अविभाज्य व्यवस्था बनू पाहत असल्याचे दिसते. आज जागतिकीकरण,पाश्चिमात्यिकरण, प्रक्रियेचा प्रभाव व त्यातून होत असलेली स्थलांतरण प्रक्रिया कुठेतरी ग्रामीण समाजव्यवस्था बदलू पाहण्याचा एक प्रवाह यानिमित्ताने पुढे येत आहे. अर्थात या स्थलांतरण प्रक्रियेला कारणीभूत परिस्थिती व यातूनच बदललेली जीवनशैली, कौटुंबिक परिस्थिती, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक परिस्थिती व यातून निर्माण झालेले ग्रामीण समाजव्यवस्थेवर दूरगामी स्वरूपाचे सकारात्मक,नकारात्मक स्वरूपाचे परिणाम हे देखील एक स्थलांतरण व्यवस्था टिकवण्याचे व चालना देण्याचे द्योतक बनत आहे हे ही या संपूर्ण आढाव्यावरून स्पष्ट होतात. भारतीय ग्रामीण समाजाचा देशाच्या टक्केवारीनुसार विचार केला तर ६५टक्के लोकसंख्या (२०२१ माहितीनुसार)ही ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. म्हणजे व्यवस्थेचा बहुसंख्य लोकसंख्येचा भाग हा ग्रामीण भागात वास्तव्यास आहे. आणि तिथूनच जर स्थलांतर (एकतर्फे) होत असेल तर ग्रामीण समाज व्यवस्था आणि तेथील युवा वर्ग ग्रामीण अर्थव्यवस्था, पारंपारिक संस्कृती, ग्रामीण जीवनशैली, पारंपारिक व्यवसाय अशा विविध ग्रामीण आवश्यक आणि व्यवस्था टिकवू ikg.kkj;k वारशांना मुकल्याशिवाय राहणार नाही ही दुसरी बाजू देखील या निमित्ताने आज आव्हान स्वरूपात निर्माण झाली आहे.

## स्थलांतर प्रक्रिया – (ग्रामीण ते शहरी)

या प्रक्रियेमध्ये व्यक्तीचे एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी, एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात तात्पुरते किंवा कायमस्वरूपी येणे जाणे किंवा स्थिरावणे समाविष्ट असते."एका विशिष्ट समुदायातील एका विशिष्ट वर्गाचे काही विशेष कारणास्तव एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणांवर कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपातील आवक–जावक किंवा स्थिरावण्याची प्रक्रिया म्हणजेच स्थलांतर प्रक्रिया असते."

या प्रक्रियेमध्ये हंगामी स्वरूपाचे देखील स्थलांतर समाविष्ट आहे. विशिष्ट हंगामामध्ये मजुरांचे होणारे स्थलांतर, विशिष्ट हंगामामध्ये प्राणी व पक्षांचे स्थलांतरण, विशिष्ट कर्मचारी यांचे देखील बदली झाल्यानंतर स्थलांतर, विद्यार्थ्यांचे शिक्षणाचे निमित्ताने वा अन्य कारणाने होणारे स्थलांतर, युवकांची नोकरी वा अन्य कारणाने होणारे स्थलांतर समाविष्ट आहे,म्हणजेच एका ठिकाणावरून, एका प्रदेशावरून दुसऱ्या ठिकाणी वा प्रदेशामध्ये होणारे तात्पुरते वा कायमस्वरूपी स्वरूपाचे येणे जाणे किंवा स्थायित्व समाविष्ट असल्याचे स्पष्ट होते.

गेल्या तीन–चार दशकांत ग्रामीण भागातून शहरांकडे वाढलेले स्थलांतरण हे अचानक घडलेले नसून ग्रामीण व्यवस्थेतील मूलभूत समस्यांचे द्योतक आहे. रोजगार, पाणी, शिक्षण, आरोग्य आणि सन्मानाचे जीवन याबाबतीत गावे मागे पडत गेली आणि शहरे पर्याय म्हणून पुढे आली.

## स्थलांतराचा वेग आणि युवा पिढी

१९८० नंतर ग्रामीण स्थलांतराचा वेग सातत्याने वाढताना दिसतो. सुरुवातीला हंगामी मजुरीसाठी शहर गाठणारा शेतमजूर किंवा युवक, पुढे कायमस्वरूपी शहरातच स्थायिक होतो. गावात उरतात ते वृद्ध, महिला आणि शेतीला धरून राहिलेले शेतकरी. हा बदल केवळ आकडेवारी पुरता मर्यादित नाही (

तो गावाच्या सामाजिक संरचनेला, अर्थव्यवस्थेला आणि संस्कृतीला हादरविणारा आहे. गावातील पायाभूत सुविधांचा विचार केला तर आजही अनेक गावांमध्ये वर्षभर पाणी पुरवठ्याची शाश्वती नाही. प्राथमिक आरोग्य सुविधा अपुऱ्या आहेत. शिक्षण पूर्ण केल्यानंतर गावात रोजगाराच्या संधी उपलब्ध नाहीत. रस्ते, वाहतूक, डिजिटल कनेक्टिव्हिटी या बाबतीतही अनेक गावे मागे आहेत. शेतीची अवस्था अधिकच बिकट झाली आहे. कधीकाळी शेती ही सुरक्षित उपजीविका होती. आज ती अत्यंत जोखमीची आणि अनिश्चित बनली आहे.

पाण्याची शाश्वती नाही, पावसाचा भरवसा नाही, उत्पादन खर्च सातत्याने वाढत आहे, बाजार भाव अस्थिर आहेत, आणि हमीभाव जाहीर होऊनही शेतकऱ्यांच्या हातात प्रत्यक्ष लाभ पोहोचत नाही. शेती आता उपजीविकेपेक्षा जुगार बनली आहे. अशा एक ना अनेक कारणांमुळे ग्रामीण स्थलांतराचा वेग हा झपाट्याने वाढल्याचे दिसते.

## स्थलांतराची मुख्य कारणे

१)शेतीतील अनिश्चितता २)रोजगाराचा अभाव ३)सुविधांची कमतरता ४)सामाजिक /आर्थिक प्रतिष्ठा ५)आधुनिक जीवनशैली ६)विचार स्वातंत्र्य ७)कौशल्य विकासाची संधी ८) पारंपारिक व्यवसायाचे कमी प्राबल्य ९)शैक्षणिक सुविधांची वानवा १०) वैद्यकीय आधुनिक सोयी. ११) विकासाचा दुय्यम दर्जा

## स्थलांतराचे परिणाम –(सकारात्मक आणि नकारात्मक)

तरुण पिढीच्या स्थलांतरणाचे समाजावर आणि स्वत: तरुणांवर सकारात्मक व नकारात्मक असे दोन्ही प्रकारचे परिणाम होतात.

## सकारात्मक परिणाम

१)नवनव्या रोजगाराच्या संधीची उपलब्धता २)कौशल्य विकासाला चालना ३)नाविन्यता. ४)आर्थिक प्रगती. ५)शिक्षणाच्या नवनव्या दिशा उपलब्ध होतात. ६)सामाजिक संरचनेत बदल ७)सामाजिक विकासाला हातभार लागतो ८)सामूहिक हिताला प्राधान्य ९)वैचारिक दृष्टिकोनात बदल १०)शाश्वत विकासाचा विचार

इत्यादी वरील सकारात्मक परिणामांचा पगडा हा ग्रामीण व्यवस्थेवर दिसून येतो व यातून ग्रामीण परिवर्तनाची दिशा ही निश्चित होण्यासही हातभार लागतो.

## नकारात्मक परिणाम

१)मानवी संसाधनांची तूट २)शहरी भागांवर वाढता ताण ३)प्रादेशिक विषमता ४)कौटुंबिक दुरावा५)सांस्कृतिक संघर्ष ६)पारंपारिक व्यवसायांचा ह्रास झाला.७)पिढी अंतर्गत संघर्ष ८)ग्रामीण भागाचे ओसाड चित्र ९)वडिलोपार्जित संपत्तीत हिस्सा भाव वाढीस १०)नातेवाईकांमधील जिव्हाळा भाव कमी

इत्यादी अशा विविध नकारात्मक बाबींमधून स्थलांतरण प्रक्रियेतून समाज व्यवस्था व युवा पिढी या विविध नकारात्मक पैलूंमधून न भरून निघणारी हानी स्पष्ट दिसून येते.

## स्थलांतर प्रक्रिया ग्रामीण तरुणांच्या माध्यमातून संवर्धित करण्यासाठीचे उपाय

### कृषी आधारित उद्योग–

केवळ शेती न करता त्यावर प्रक्रिया करणारे (Processing Units, Packing) यासारखे प्रक्रिया उद्योग सुरू केल्यास स्थानिक लोकांना उद्योगाची संधी निर्माण होऊन ग्रामविकासास हातभार लागू शकतो व परिणामी स्थलांतरण (ग्रामीण) प्रक्रिया प्रभावित होऊ शकते.

### विविध कौशल्य विकास प्रशिक्षण–

पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (DDU-GKY) यासारख्या योजनांमधून ग्रामीण युवकांना प्रशिक्षण देऊन ग्रामीण भागांमध्ये विविध उद्योग व्यवसाय स्थापन होण्यासोबतच ग्रामीण युवकांना याद्वारे उद्योजक बनविण्याची संधी निर्माण करता येईल.

### सामुदायिक सहभाग—

वनराई सारख्या विकासात्मक, निसर्ग संवर्धनात्मक संस्था लोकांच्या मार्फत पडीत जमिनीचा विकास आणि जलसंधारणाची कामे करून गावांना समृद्ध करण्याचे काम स्थानिक पातळीवर केल्या जात आहे व या उपक्रमांच्या माध्यमातून मोठा जण सहभाग देखील लाभत आहे.

### शाश्वत विकास—

ग्रामीण स्थलांतरण व विकास घडवून आणायचा असेल तर ग्रामीण भागातील प्रत्येक क्षेत्र (शेती, उद्योग, शेती पूरक व्यवसाय) यासारख्या विविध क्षेत्रांमध्ये शाश्वत आणि टिकाऊ स्वरूपाचा विकास घडवून आणावा लागेल.

### ग्रामपंचायतींनी शाश्वत प्रयत्न करणे गरजेचे—

ग्रामीण स्थलांतर रोखण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतींनी धोरणात्मक आराखडा तयार करून स्थलांतर रोखण्यास महत्त्वाची भूमिका बजावता येईल

### भविष्यकालीन वाटचाल —

ग्रामीण युवकांची स्थलांतरण कमी करण्यासाठी ग्रामीण भागात तांत्रिक कौशल्य, कृषी आधारित प्रक्रिया उद्योग आणि निसर्गसंवर्धनावर आधारित उपजीविकेची साधने निर्माण करणे गरजेचे आहे.

### निष्कर्ष —

ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे तरुणांचे स्थलांतर हे केवळ लोकसंख्येचे स्थलांतर नसून ते ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बदलाचे एक प्रतीक आहे. या समस्येचा सखोल विचार केल्यास पुढील निष्कर्ष निघतात,— १)मूलभूत सोयी सुविधांचा अभाव २)पारंपारिक व्यवसायाबद्दल उदासीनता ३)उपाययोजनांची काटेकोर अंमलबजावणी आवश्यक ४)ग्रामीण भागांचे ओसाड चित्र/अस्तित्व धोक्यात ५)आर्थिक पुंजी ६)वैयक्तिक जीवनमान उंचावण्याची हाव ७)ग्रामीण सामाजिक अस्तित्वच धोक्यात ८)शासकीय स्तरावर ग्रामीण आराखडा काटेकोर अंमलबजावणीत अडसर ९)शेती व्यवसाय धोक्यात १०)कौशल्यानुसार काम न मिळणे ११)विकासात्मक तफावत/विषमता निर्माण होते १२)सांघिक भावना लोप पावताना दिसते १३)संयुक्त कुटुंब पद्धती लोप पावत आहे १४)उपाय योजना अंमलबजावणीत क्लिष्टता. १५)शासकीय धोरणांची अस्पष्टता. १६)शासकीय/सामाजिक उदासीन दृष्टिकोन १७)प्रशासकीय दिरंगाईचे धोरण १८)ग्रामीण जागृतीचा अभाव

## ग्रामीण युवक स्थलांतर सांख्यिकीय माहिती

| स्थलांतराचे स्वरूप | टक्केवारी | मुख्य कारण |
|---|---|---|
| ग्रामीण ते शहरी स्थलांतर (पुरुष) | ३३.५टक्के | रोजगार आणि शिक्षण |
| ग्रामीण ते शहरी स्थलांतर (महिला) | १५.६ टक्के | विवाह आणि कुटुंबीयांसोबत |
| ग्रामीण राज्यातच स्थलांतर (पुरुष) | ६२.५ टक्के | जवळच्या शहरात स्थलांतर |
| रोजगारासाठी स्थलांतर (स्थायी/ तात्पुरते) | >५० टक्के | बिगर कृषी क्षेत्रातील नोकऱ्या |
| स्थलांतरणाचे प्रमुख कारण (युवक) | ६०—७० टक्के | शेतीतील उत्पन्नाचा अभाव |

## संदर्भ ग्रंथ सूची

1)Hajare,R.A.(2023).”Migration of Rural Youth:Education,Skill Learning,Entrepreneurship & Future of Farming.”

2) Internatinal Organization Form Migration(IOM). (2005). World Migration Report. .

3) United Nations . (2014). Migration & Youth: Challengeas & Opportunites..

४) सवदी ए. बी. कोळेकर पी.एस.(२००३) मानवी लोकसंख्या भूगोल पुणे, निराली प्रकाशन.

५) आगलावे प्रदीप (२००९) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन, पृष्ठ क्रमांक ३४९ते३७३.

६) कुलकर्णी पी. के.(१९९८). भारतातील सामाजिक समस्या नागपूर, विद्या प्रकाशन, पृष्ठ क्रमांक १९ ते ४८ व ६२ते ८२.

७) अग्रवाल ए. एन.(२०११) भारतीय अर्थव्यवस्था विकास एवं आयोजन, नई दिल्ली, न्यू एज इंटरनॅशनल पब्लिकेशन.

८) संघवे विलास (१९९१) भारतातील सामाजिक समस्या, कोल्हापूर, पॉप्युलर प्रकाशन, पृष्ठ क्रमांक १४२ ते २७४.

९) गंदेवार एस. एन. भारतीय समाज (वादातीत विषय आणि समस्या) लातूर, विद्याभारती प्रकाशन.

१०) तोरवणे डी. एल. व महाजन जयश्री (२००८). भारतीय समाज प्रश्न आणि सामाजिक समस्या, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन, पृष्ठ क्रमांक १२७ ते१५१



ग्रामीण युवक स्थलांतर दर्शक छायाचित्र